# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०१७ / चैत्र ३, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उद्योग व खनिकर्म मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |
| **(४)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३०**

---

### खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील एमआयडीसी भाग २ करिता भूसंपादनाची प्रक्रिया रद्द करण्याबाबत

**(१) * ७४५०७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) मौजे केळवली, वांगणी, घोडवली, कांढरोली, नावंढे, माणकिवली, अंजरूण, हाळखुर्द व कर्जत तालुक्यातील तळवली येथील खालापूर एमआयडीसी भाग २ करिता प्रस्तावित भूसंपादन प्रक्रिया अंतिमरित्या रद्द करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.उद्योग मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ भाग-२ मध्ये (ता. खालापूर, जि. रायगड) येथील प्रस्तावित गावांच्या ७/१२ वरील एमआयडीसी ची पेन्सिलद्वारे केलेली नोंद रद्द करुन ७/१२ कोरा करुन मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. उद्योग मंत्री यांना दिनांक १८ऑगस्ट,२०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूसंपादन प्रक्रियेच्या वेळी नोंद करताना शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या नोटीसा देण्यात आल्या नाहीत तसेच औद्योगिक प्रयोजनासाठी जमीन संपादित केल्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन शिल्लक राहणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी करून उक्त औद्योगिक प्रयोजनासाठी प्रस्तावित भूसंपादन प्रक्रिया रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर बाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. १८/०७/२०१६ रोजी विनंती अर्ज सादर केलेला आहे.

तथापि, मऔवि अधिनियम, १९६१ चे कलम १(३) नुसार प्रकरण-६ व कलम-२ (खंड-ग) च्या तरतूदी लागू करण्याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात दिनांक २२.०९.२०१५ व दि.०४.०६.२०१६ रोजी प्रसिध्द झालेली आहे. त्यानुसार उक्त अधिनियमाचे कलम-३२(२) नुसार वैयक्तिक नोटीसा बजावून भूसंपादनाची पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, रायगड अंतर्गत उपविभागीय अधिकारी, कर्जत/खालापूर यांचेमार्फत सुरु आहे.

सदरचा प्रकल्प तयार झाल्यावर लहान मोठे उद्योग या भागात निर्माण होऊन त्यामध्ये मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असल्याने आपोआपच स्थानिक तरुणांना त्यांचे योग्यतेनुसार नोकरी तसेच व्यवसायात संधी उपलब्ध होऊ शकतात. त्याचप्रमाणे नवीन भूसंपादन कायदयान्वये शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला वाटप करताना विकसीत १५ टक्के भूखंड हवा असल्यास / हवा नसल्यास असा विकल्प महामंडळ देत असल्यामुळे १५ टक्के भूखंड हवे असणाऱ्या शेतकऱ्यांकडून स्वत:चे लहान मोठे उद्योगधंदे निर्माण करता येतील व त्यामुळे शेतकऱ्यांना कायम स्वरुपी काम मिळू शकेल.

(४) भूसंपादनाची कार्यवाही चालू असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही

---

## सावर्डे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे महावितरणची तार गळ्यात अडकून एका दुचाकीस्वाराचा झालेला मृत्यू

**(२) * ८३३७० श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावर्डे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे महावितरणची रस्त्यावर लोंबणारी तार गळ्यात अडकून एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर धोकादायकरीत्या लोंबकळत असणाऱ्या तारांची माहिती महावितरणच्या संबंधीत कार्यालयाला देण्यात येऊनही तारांची दुरुस्ती न झाल्यामुळे सदर दुर्घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या दुर्घटनेची चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच या घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या कुटूंबियास शासनाने कोणती आर्थिक मदत दिली वा देण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार रोड क्रॉसींग गार्डींगची वायरचे टोक ट्रकच्या हुडाला अडकून ताणले गेल्यामुळे गार्डींग वायर तुटून रोड वरुन मोटारसायकल वरुन जाणाऱ्या श्री. मयुर देवरुखकर यांच्या गळयात अडकून यांचा प्राणांतिक अपघात झालेला आहे. प्रथमदर्शनी श्री. धनंजय ना. वामने, तंत्रज्ञ दोषी असल्याचे निदर्शनास आल्याने कंपनीने त्यांना निलंबित केले आहे. सदर अपघाताची प्राथमिक चौकशी संबंधित विद्युत निरीक्षकांनी देखील केलेली असून त्यांच्याकडून अंतिम चौकशी अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे.

(४) महावितरण कंपनीच्या प्रचलित नियमानुसार नुकसान भरपाईची रक्कम रु. ४,००,०००/- मृत व्यक्तीच्या वारसदार आई-वडिलांना दि. ७/०३/२०१७ रोजी देण्यात आलेली आहे.

-----------------

## गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील आश्रमशाळांमधील असुविधांबाबत

**(३) * ७४०४४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यात १५६ आदिवासी आश्रमशाळा व २५ आदिवासी वसतीगृहे असून दोन्ही जिल्ह्यात ३५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळांकरिता इमारती बांधण्यात आलेल्या नाहीत, शौचालय सुविधा, विद्युत व्यवस्था व रस्ता उपलब्ध नाही तसेच विद्यार्थ्यांना दोन वेळचे जेवण मिळत नसणे इ.समस्या असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) तसेच सदर आश्रमशाळांमध्ये शिक्षक संवर्गातील सुमारे ५०० पदे रिक्त असून सदर पदे भरण्याबाबत विद्यार्थ्यांनी मा.पालकमंत्री यांच्या निवासस्थानासमोर माहे डिसेंबर, २०१६ मध्ये आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दिनांक १५ जानेवारी, २०१७ रोजी मा.आदिवासी विकास मंत्री यांना कार्यवाही करण्याबाबत निवेदन दिले असून याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) चंद्रपूर जिल्ह्यात १३ व गडचिरोली जिल्ह्यात ४३ अशा एकूण ५६ शासकीय आश्रमशाळा सुरु आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यात ३४ व गडचिरोली जिल्ह्यात ५० अशा ८४ अनुदानित आश्रमशाळा सुरु आहेत. या दोन्ही जिल्ह्यामध्ये १४० शासकीय व अनुदानित आश्रमशाळा सुरु आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यात २९ व गडचिरोली जिल्ह्यात ३३ अशी एकूण ६२ वसतीगृहे सुरु आहेत.

चंद्रपुर व गडचिरोली जिल्ह्यातील वरील शासकीय आश्रमशाळामध्ये १५,५५६ अनुदानित आश्रमशाळांमध्ये २९,१८१ व शासकीय वसतीगृहांमध्ये ५,१६५ असे एकूण ४९,९०२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

(२) चंद्रपूर जिल्ह्यातील १३ शासकीय आश्रमशाळांपैकी सर्व आश्रमशाळांसाठी पक्की इमारत आहे. गडचिरोली जिल्ह्यातील ४३ आश्रमशाळांपैकी ४२ आश्रमशाळांना स्वताची पक्की इमारत आहे. १ शासकीय आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीत सुरु आहे.

दोन्ही जिल्ह्यातील सर्व शासकीय आश्रमशाळांमध्ये विजेची सोय, शाळेपर्यंतचा रस्ता व शौचालय इ. उपलब्ध आहे. सदर सर्व आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना मेनूप्रमाणे भोजन व अल्पोपहार देण्यात येतो.

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील ८४ अनुदानित आश्रमशाळांपैकी ५० आश्रमशाळांना स्वत:च्या इमारती असून ३४ आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीत सुरु आहेत.

८४ अनुदानित आश्रमशाळांपैकी ६४ आश्रमशाळांना वीज व ७८ आश्रमशाळांच्या रस्त्याची सोय आहे. सदर सर्व आश्रमशाळांमध्ये मेनूप्रमाणे भोजन व अल्पोपहार देण्यात येतो.

सर्वच शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहाची आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती व देखभाल करणेबाबत एप्रिल-मे २०१७ च्या उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये प्रकल्प अधिकाऱ्याकडून नियोजन बध्द पध्दतीने कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यामध्ये रिक्त पदे भरण्याबाबत मा. पालकमंत्री यांच्या घरासमोर अशा प्रकारे आंदोलन केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

चंद्रपुर व गडचिरोली जिल्ह्यमधील शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षक संवर्गाची ८६० पदे मंजूर असून ६०८ पदे भरलेली आहेत व २५२ पदे रिक्त आहेत.

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यामध्ये अनुदानित आश्रमशाळामध्ये ११३० पदे मंजूर असून त्यापैकी १०२५ पदे भरलेली आहेत व १०५ पदे रिक्त आहेत.

शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत कालबध्द कार्यक्रम निश्चित करुन सदर पदे जून, २०१७ पर्यंत भरण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गाची पदे भरण्यासंदर्भात संबंधित संस्था चालकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) व (५) प्रकरणी मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांच्या दि. २१.१.२०१७ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांच्याकडून वरील उत्तरात नमूद भाग (२) व (३) प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयातील उद्योग उभारण्यासाठी वितरीत केलेले भूखंड विनावापर पडून असल्याबाबत

**(४) * ७७६८५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील विशेषत: सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयामधील उद्योजकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) उद्योग उभारण्यासाठी वितरीत केलेले ५१ भूखंड वापराविना पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भूखंडाची मुदत दिनांक ३१ जानेवारी,२०१७ रोजी संपुष्टात येवूनही शासनाने उद्योग न उभारणा-या संस्थाकडून भूखंडाचा ताबा न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच उक्त भूखंड त्वरित ताब्यात घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई : (**१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयातील एकूण ८ औद्योगिक क्षेत्रामध्ये २६५१ भूखंडांचे आरेखन करण्यात आले असून २४९५ भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. त्यामधील विकसित न केलेले ३६ भूखंड महामंडळाने पंचनामा करुन ताब्यात घेतले आहेत. तसेच १५४ भूखंडधारकांना उद्योग संजीवनी योजनेमध्ये भाग घेण्याबाबत कळविण्यात आले असून ४४ भूखंडधारकांना उद्योग संजीवनी योजनेअंतर्गत दिनांक ३१/८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.उर्वरित उद्योग संजीवनी योजनेमध्ये भाग न घेतलेल्या ११० भूखंडधारकांना महामंडळाच्या धोरणानुसार नोटिसा बजावून भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शेवाळेवाडी-म्हासोली (ता.कराड,जि.सातारा) येथील रयत सहकारी साखर कारखान्याने शेतक-यांची ऊस देयके अदा केली नसल्याबाबत**

**(५) * ८२८२९ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवाळेवाडी-म्हासोली (ता.कराड,जि.सातारा) येथील रयत सहकारी साखर कारखान्याला सन २०१४ मध्ये गाळपासाठी दिलेल्या ऊसाची १० कोटी रुपयांची देयके शेतक-यांना अद्यापही अदा करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देयके मिळाण्याकरिता म्हणून येथील शेतक-यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १५ दिवस उपोषण केले असतानाही शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने मध्यस्थी करुन सदर साखर कारखान्याकडून शेतक-यांची ऊस देयके देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

कुमुदा-रयत कारखान्याकडे हंगाम २०१४-१५ मधील शेतकऱ्यांच्या FRP ची रु.९,९५,६४,०७५/- रक्कम थकीत आहे.

(२) कुमुदा कारखान्याकडील थकीत ऊसदेयके मिळणेसंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने दि.०६/०१/२०१७ पासून जिल्हाधिकारी सातारा यांचे कार्यालयासमोर उपोषण सुरु केले असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाने दि.०९/०१/२०१७ चे पत्रान्वये साखर आयुक्त यांना कळविले. संघटनेचे उपाध्यक्ष व इतर शेतकरी यांचेशी साखर आयुक्तालयामध्ये दि.१६/०१/२०१७ रोजी कुमुदा शुगर्स यांचेकडील प्रलंबित FRP देयके, RRC वसुली, साखर आयुक्तालयाकडून करण्यात आलेली कार्यवाही, न्यायालयीन प्रकरणाबाबत समक्ष चर्चा करण्यात येवून प्रकरणाची सद्यस्थिती अवगत करण्यात आली आहे. तसेच जिल्हाधिकारी, सातारा यांनाही सदर प्रकरणाची सद्यस्थिती संघटनेस / शेतकऱ्यांना अवगत करणेस दि.२०/०१/२०१७ चे पत्रान्वये साखर आयुक्त कार्यालयाने कळविले आहे.

(३) थकीत रक्कम वसुलीकामी कारखान्याविरुध्द महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन अधिनियम, २०१३, कलम-७ चे तरतुदीनुसार मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कराड येथे फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) तालुक्यात महावितरणाकडून चुकीच्या पध्दतीने रिडींग घेतल्याने ग्राहकांचे होत असलेले आर्थिक नुकसान**

**(६) * ७६९७४ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यात महावितरणकडून चुकीच्या पद्धतीने घेतले जाणारे रिडींग, वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा, रिडींग न घेता वीजबिल पाठविणे याबाबत महावितरणकडे तक्रार करूनही दुर्लक्ष केले जात असल्यामुळे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान नागरिकांद्वारे मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच या परिसरात महावितरण कंपनीकडून बसविण्यात आलेल्या प्लॅश आणि रोलेक्स कंपनीच्या हजारो मीटर्समध्ये अनेक तांत्रिक चुका असल्यामुळे मोठया प्रमाणात ग्राहकांची आर्थिक फसवणूक झाल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मीटर्सची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यापैकी किती मीटर सदोष आढळून आले व या मीटरच्या माध्यमातून ग्राहकांचे किती आर्थिक नुकसान झाले आहे,

(४) तसेच प्रश्न भाग १ बाबत वीज ग्राहकांकडून आलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने महावितरण कंपनीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

महावितरण कंपनीच्या कल्याण मंडल २ अंतर्गत येणाऱ्या मांडा-टिटवाळा शाखा कार्यालयावर दिनांक ०९.१२.२०१६ रोजी २० ते २५ नागरिकांचा मोर्चा आला होता.

(२) हे खरे आहे.

फ्लॅश आणि रोलेक्स कंपनीच्या मीटर्स मध्ये तांत्रिक दोष आढळून आले होते. परंतु सदर मिटर्सच्या संबंधीच्या तक्रारीचे ताबडतोब निवारण करण्यात आले आहे. त्यामुळे ग्राहकांची कोणतीही आर्थिक फसवणूक झालेली नाही.

(३) कल्याण तालुका अंतर्गत महावितरण कंपनीकडून सदोष मिटर्सची पाहणी करण्यात आली आहे. रोलेक्स कंपनीचे ११२५१९ व फ्लॅश कंपनीचे २४३९५ मीटर्स बदली करण्यात आली आहेत. ग्राहकांचे चुकीचे आलेले वीजबिल दुरुस्त करुन देण्यात आले आहे.

(४) मीटर सदोष असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यावर ती मीटर्स तातडीने बदलण्यात आली असून ग्राहकांस जर चुकीचे वीज देयके गेले असेल तर त्यांचे मीटर वाचनानुसार तातडीने दुरुस्ती करुन देण्यात आलेली आहे. मांडा टिटवाळा या परिसरात वीज पुरवठा सुरळीत राहण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत पुढीलप्रमाणे देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात आलेली आहेत.

(अ) लघुदाब वाहिनीवरील १८५० स्पेसर्स लावलेले आहेत.

(ब) २५ रोहित्राच्या लघुदाब वाहिनीवरील झाडांच्या फांद्या छाटण्यात आल्या आहेत.

(क) १५ रोहित्रांची देखभाल व दुरुस्ती केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अस्वाली (ता.डहाणू, जि.पालघर) आश्रमशाळेत मद्यपी मुख्याध्यापकाने विद्यार्थ्यांना केलेली मारहाण

**(७) * ७४२८८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्रीमती देवयानी**

**फरांदे (नाशिक मध्य), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अस्वाली (ता.डहाणू, जि.पालघर) येथील आश्रमशाळेतील ३५ ते ४० विद्यार्थ्यांना मद्यपी मुख्याध्यापकाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी बेदम मारहाण करुन डांबरी रस्त्यांवर झोपून चालण्याची शिक्षा केल्याची माहिती माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुख्याध्यापक हे मद्य प्राशन केल्यानंतर नेहमीच विद्यार्थ्यांना बेदम मारहाण करीत असून भितीपोटी विद्यार्थी याबाबत कुठेही वाच्यता करण्यास तयार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी प्रकल्प कार्यालयात जावून तक्रार करुनही त्याची दखल प्रकल्प कार्यालयाने घेतली नसल्याने या गंभीर प्रकरणाची शासन चौकशी करणार आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित मुख्याध्यापक व या घटनेकडे दुर्लक्ष करणारे प्रकल्प अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) मुख्याध्यापकाने दि.०१.०१.२०१७ रोजी २-३ विद्यार्थ्यांना मारहाण करुन रस्त्यावर झोपून चालण्याची शिक्षा केल्याचे चौकशी दरम्यान विद्यार्थ्यांनी नमूद केले आहे.

(२), (३) व (४) शासकीय माध्यमिक आश्रमशाळा,अस्वाली ता.डहाणू जि.पालघर येथील २२ विद्यार्थ्यांनी आश्रमशाळेचे मुख्याध्यापक श्री. वाघ यांनी त्यांना मारहाण केल्याबाबत मा. श्री. आनंद ठाकूर, विधान परिषद सदस्य यांच्याकडे दि. ०१.०१.२०१७ रोजी तक्रार केली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने एकात्मिक

आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू कार्यालयाने दि.०३.०१.२०१७ रोजी श्री. वाघ,मुख्याध्यापक यांची तसेच तक्रारदार विद्यार्थ्यांची चौकशी केली आहे. दि. ०१.०१.२०१७ रोजी दुपारी ४.०० ते ४.३० दरम्यान इयत्ता ५ वी ते ८ वी चे विद्यार्थी गोंधळ करत असल्यामुळे मुख्याध्यापकांनी सदर विद्यार्थ्यांना शिक्षा केल्याचे विद्यार्थी व मुख्याध्यापकांनी मान्य केले आहे. सदर कृत्याबाबत श्री. वाघ, मुख्याध्यापक यांची अन्य आश्रमशाळेत बदली करण्यात आली असून त्यांच्या विरुद्ध प्रशासकिय कार्यवाही प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जलविद्युत विभागाचे महावितरण व महानिर्मिती कंपनीकडे**
**कोट्यवधी रुपये थकीत असल्याबाबत**

**(८) * ७७५६३ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या जलविद्युत विभागाकडून घेतलेल्या वीजेचे महावितरणकडे ६३२ कोटी तर महानिर्मितीकडे तब्बल १३६८ कोटी रुपये थकबाकी असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू थकबाकी अद्याप न भरण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच ही थकबाकी वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सरदार सरोवर व पेंच जलविद्युत प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीज खरेदी पोटी जानेवारी, २०१७ अखेर महावितरण कंपनी कडून जलसंपदा विभागास रु.४०७.९३ कोटी इतकी रक्कम देणे आहे. तर महानिर्मिती कंपनीकडून राज्यातील २६ जलविद्युत प्रकल्पांच्या भाडेपट्टी पोटी सन २०१६-१७ मध्ये रु. १०९१.४४ कोटी जलसंपदा विभागास देणे आहे.

(२), (३) व (४) शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेतून देय रक्कम जलसंपदा विभागास अदा करण्यात येणार आहे.

-----------------

## दत्तापूर (ता. धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) येथील ११ के. व्ही. मंगरुळ फीडर विद्युत लाईन भूमिगत करणेबाबत

**(९) * ८१६९३ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दत्तापूर (ता. धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) येथील ११ केव्ही मंगरुळ फीडर विद्युत लाईन ही नागरी वस्तीवरुन जात असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी होण्याची शक्यता असल्यामुळे सदर लाईन भूमिगत करणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता (ग्रा.) म.रा.वि.वि.क. मर्या. यांना दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या तालुक्यातील मौ. दिपोरी येथील ११ के.व्ही. विद्युत लाईनची जोडणी राजना-वाई मार्गे करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यवाही अभियंता (ग्रा.) म.रा.वि.वि.क.मर्या. अमरावती यांना दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) त्यानुसार, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे ही खरे आहे.

(३) अमरावती जिल्हयातील दत्तापुर (ता.धामणगाव रेल्वे) येथील ३३ के.व्ही मंगरुळ दस्तगीर उपकेंद्रातुन निघणारी ११ के.व्ही. मंगरुळ विद्युत वाहिनी ही नागरी वस्तीवरुन जात असल्यामुळे जीवीतहानी व वित्तहानी होण्याची शक्यता असल्यामुळे सदर वाहिनी भूमिगत करण्याबाबतचे अंदाजपत्र कार्यकारी अभियंता, अमरावती ग्रामिण यांनी तयार केले असून सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हा नियोजन अधिकारी, अमरावती यांचेकडे अधिक्षक अभियंता, अमरावती यांनी दि. ०४.०३.१७ सादर केलेले आहे.

दिपोरी गावाचा विज पुरवठा ११ के.व्ही. कुऱ्हा या सिंगल फेंजिंग वाहिनीव्दारे होत असून सदर वाहिनीची लांबी ७० कि.मी. आहे. तसेच सदरची वाहिनी अतिभारीत असल्यामुळे दिपोरी गावाला कमी दाबाचा विज पुरवठा होतो त्यामुळे सदर गावाचा विज पुरवठा हा चांदूर रेल्वे शहरी वाहिनीशी जोडण्याची गावकऱ्यांची व मा. स्थानीक लोकप्रतिनीधींची मागणी आहे. परंतु दिपोरी गावामध्ये कृषिपंपाचा भार अधिक असल्यामुळे दिपोरी गाव हे राजना-वाई येथे असलेल्या चांदुर रेल्वे शहरी फिडरवरुन जोडणे तांत्रिक दृष्टया शक्य होणार नाही.

दिपोरी येथील ११ के.व्ही. विद्युत वाहिनीची लांबी तसेच या वाहिनीवरील तांत्रिक बिघाड कमी करण्याकरिता चांदूर रेल्वे एम.आय.डी.सी. मध्ये आय.पी.डी.एस. योजनेअंतर्गत ३३/११ के.व्ही. उपकेंद्राचे काम प्रस्तावित असून सदर कामांचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नंदुरबार जिल्हयात उद्योजकांनी बनावट कागदपत्रांद्वारे अनुदान घेतल्याबाबत**

**(१०) * ७९०२५ श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हयात बनावट कागदपत्रांद्वारे २९ उद्योजकांनी तब्बल ६ कोटी ३ लाख १४ हजार ८६२ रुपयांचे अनुदान घेतल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीअंती दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) राकेश पितऱ्या नाईक व श्री.अमर तु.पाडवी यांनी केलेल्या तक्रारीवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदूरबार यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीअंती सामुहिक प्रोत्साहन योजना-२००१ राबविताना लाभधारक घटकांनी या योजनेचा लाभ घेताना जिल्हा उद्योग केंद्र,

नंदुरबार येथील तत्कालीन अधिकारी/कर्मचारी यांचेशी संगनमत करुन बेकायदेशीर व अप्रामाणिकपणे सादर केलेल्या प्रस्तावात बनावट कागदपत्रे सादर करुन, नियम, अटींचे व शर्तींचे पालन झालेले नसतांना नियम, अटीं व शर्तींचे पालन केले असल्याबाबत खोटी / बनावट प्रमाणपत्र सादर करुन ती अनुदान प्राप्त करण्यास वापरली आहेत असे आढळून आले आहे.

(२) व (३) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार यांनी केलेल्या चौकशीनुसार जिल्हा उद्योग केंद्र, नंदुरबार येथे कार्यरत असलेले तत्कालीन अधिकारी /कर्मचारी (१) श्री.स्वरुपसिंग पाया वसावे, महाव्यवस्थापक (सेवानिवृत्त) (२) दामु शंकर पाडवी, शाखाप्रमुख, वर्ग-३ (३) श्री.विजयकुमार म्हसुदेव निक्रड, लघुटंकलेखक (नि.श्रे.) वर्ग-३, (४) जगदिश रघुनाथ श्रीवास, उद्योग निरिक्षक, वर्ग-३ (५) ओंकार गुरुदयाल चव्हाण, उद्योग निरिक्षक, वर्ग-३ (सेवा निवृत्त) यांनी उद्योग घटकांचे मालकांशी संगनमत करुन शासनाविरुध्द कट रचून, शासनाने निर्गमित केलेल्या सामुहिक प्रोत्साहन योजना-२००१ मधील नमूद तरतुदींचे उल्लंघन करुन अनुदान मिळण्यासाठी जे प्रस्ताव सादर केले त्यात बनावट , खोटे कागदपत्रे खोटे असल्याचे माहिती असताना त्याकडे डोळेझाक करुन शासनाचे नुकसान केले म्हणून त्यांचेविरुध्द तसेच घटकांविरुध्द नंदुरबार शहर पोलीस स्टेशन गु.र.नं.१४/२०१७ , भा.द.वि. ४२०,४६५,४६८,४७१,४७४,१२० (ब), ३४ तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (क) १३ (१) (ड), सह १३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील कोळेवाडी (ता. जुन्नर), वडेश्वर (ता.मावळ) व फुलवडे (ता. आंबेगाव) या तीन आश्रमशाळेतील असुविधांबाबत

**(११) * ८३०४७ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील कोळेवाडी (ता. जुन्नर), वडेश्वर (ता.मावळ) व फुलवडे (ता. आंबेगाव) या तीन आश्रमशाळांच्या इमारतीची दुरवस्था झाली असून आश्रमशाळेत मुलींसाठी प्रथमोपचाराची, स्नानगृहाच्या सुविधेचा व स्वतंत्र

स्वयंपाकगृहाचा अभाव असून मुलींना मारहाण केली जात असल्याचे तसेच पुरुष स्वयंपाकी मुलींशी असभ्य वर्तन करीत असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशी दरम्यान काय आढळून आले,

(३) त्यानुषंगाने संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) जिल्हाधिकारी, पुणे यांनी स्थापन केलेल्या महिला अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत पुणे जिल्हयातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या केलेल्या तपासणीच्या अहवालात अनुदानित आश्रमशाळा कोळेवाडी येथील इमारतीची दुरावस्था, मुलींच्या वसतीगृहासाठी स्वतंत्र इमारत नाही इत्यादी त्रुटी निदर्शनास आलेल्या आहेत. तसेच फुलवडे या आश्रमशाळेमध्ये मुलींसाठी वेगळे वसतीगृह नाही, स्नानगृह बंदीस्त नाही, शौचालय स्वयंपाकगृहाला लागून आहे, मुलींच्या निवासाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी नाही, जेवणात रात्री भाज्या दिल्या जात नाही, साबण, तेल, अंथरुण, पांघरुण दिले जात नाही, मुलींना अपुरे अन्न दिले जाते, स्वच्छेतेची कामे मुलींकडून करुन घेतली जातात इत्यादी त्रुटी निदर्शनास आणल्या आहेत. तसेच वडेश्वर येथील आश्रमशाळेत प्राथमिक शिक्षिकेने एका विद्यार्थीनीसोबत गैरवर्तन केल्याबद्दल तक्रार होती. तथापि, मुलींना मारहाण करण्याचे प्रकार तसेच पुरुष स्वयंपाकी मुलींशी असभ्य वर्तन करीत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) वडेश्वर आश्रमशाळेतील शिक्षिकेने विद्यार्थीनीसोबत केलेल्या गैरवर्तनाबाबत प्रकल्प अधिकारी, जव्हार, जि.पालघर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून सखोल चौकशी करण्याचे आदेश दिलेले होते. त्यानुसार प्रकल्प अधिकारी, जव्हार यांनी दि.०१ मार्च, २०१७ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार विद्यार्थीनीने केलेल्या गैरवर्तनाच्या तक्रारीत तथ्य नसल्याचे आढळून आले आहे.

अनुदानित आश्रमशाळा फुलवडे व आश्रमशाळा कोळेवाडी या शाळांचे परिरक्षण अनुदान रोखून ठेवण्यात आले आहे. तसेच फुलवडे आश्रमशाळा बंद करण्याबाबत २०१६-१७ शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर निर्णय घेण्याचे विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सालेकसा/चिंचगड (ता. देवरी,जि. गोंदिया) येथील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्याबाबत

**(१२) * ७९१०३ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा/चिंचगड (ता. देवरी, जि.गोंदिया) येथील मागासवर्गीय मुलां-मुलींना त्रास सहन करून ५० ते ६० कि. मी. अंतरावर शिक्षणासाठी जावे लागत असल्याने या ठिकाणी शासकीय मुलां- मुलींचे वसतिगृह सुरू करण्याची मागाणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृह सुरू करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सालेकसा/ चिंचगड (ता. देवरी,जि. गोंदिया) येथील मागासवर्गीय मुला-मुलींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि. १६/०५/२०१६ चे पत्र शासनास प्राप्त झाले असून सदर प्रकरणी आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रचलित नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी पाडयांना मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत

**(१३) * ८१५०१ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील रुईघर, बोपदरी, दाभेरी, पाचबुड, सागपाणा, सरोळीपाडा, रीठीपाडा हे आदिवासी पाडे वीज, रस्ते, पाणी, प्राथमिक आरोग्य केंद्र इ. मूलभूत सुविधांपासून अद्याप वंचित असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील आदिवासींना शासनाकडून कोणत्याही सुविधा मिळत नसून या गावपाड्यांमध्ये कुपोषणाचा प्रश्न देखील गंभीर असून गत वर्षात कुपोषणामुळे झालेल्या बालकांच्या मुत्यूमुळे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावपाड्यांना मूलभूत सुविधा देण्याबाबत तात्काळ योग्य त्या निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे अंशत: खरे आहे.

जव्हार तालुक्यातील (पालघर) रुईघर, बोपदरी, दाभेरी, सागपाणा, रीठीपाडा या आदिवासी पाड्यांचे विद्युतीकरण झालेले आहे. तथापि, उर्वरित पाचबुड, सरोळीपाडा या २ पाड्यास वीज पुरवठा करण्याकरिता निधी प्राप्त असून तेथील काम प्रगतीपथावर आहे.

रुईघर, बोपदरी, दाभेरी, पाचबुड, सागपाणा, सरोळीपाडा, रीठीपाडा येथील सर्व गावपाड्यांना रस्त्यांची सुविधा असून सदर गावांस पिण्याच्या पाण्याच्या विहिरी, विंधन विहिरी व नळ पाणी पुरवठा योजना अस्तित्वात आहेत. या पाड्यांना आरोग्य विषयक सुविधा व सेवा प्राथमिक आरोग्य केंद्र साखरशेत, प्राथमिक आरोग्य पथक दाभेरी, वैद्यकीय मदत पथक बोपदरी व उपकेंद्र दाभेरी मार्फत पुरविल्या जातात.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील साखर कारखान्यांच्या सहवीज निर्मिती प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेवर शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत**

**(१४) * ७३८४६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज टंचाई असून महावितरणकडून आवश्यक व अखंडीत वीज पुरविली जात नसल्यामुळे साखर उद्योगावर परिणाम होऊ नये यासाठी राज्यातील १४७ साखर कारखान्यांनी स्वत:च गुंतवणूक करुन सहवीज निर्मिती प्रकल्प उभे केले असून या प्रकल्पातून निर्माण होणा-या विजेच्या वापरावर वीज शुल्क आकारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षीच्या गाळप हंगामापासून प्रतियुनिट १ रुपया २० पैसे असे शुल्क आकारण्यात येणार असल्यामुळे साखर कारखान्यांवर सुमारे ५०० कोटींचा अतिरिक्त भार पडणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या वीजशुल्काच्या वसुलीचे आदेश ऊर्जा विभागाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) त्यानुसार साखर उद्योगावर परिणाम होऊ नये म्हणून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औसा तालुक्यातील (जि.लातूर) शेतीपंपाचे जळलेली रोहित्रे दुरुस्त करण्याबाबत

**(१५) * ८२५५५ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील शेतीपंपाची व गावठाणाची जळालेली रोहित्रे बदलून वा दुरुस्त करून देण्यास अधिक कालावधी लागत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असून सदर विलंबाची चौकशी करण्याबाबत व या विलंबामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान भरपाई देण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिंनी मा.ऊर्जा मंत्री, मा.पालकमंत्री लातूर व मुख्य अभियंता, म.रा.वि.मं, लातूर यांच्याकडे दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर निवेदनाद्वारे निलंगा विभागांतर्गत समाविष्ट गावे ग्राहकांच्या व प्रशासकीय सोयीसाठी वीज महामंडळाच्या लातूर विभागाला जोडण्याबाबत देखील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) औसा तालुक्यातील महावितरणच्या औसा उपविभागातंर्गत वर्ष २०१६-१७ मध्ये डिसेंबर, २०१६ अखेर ६३ केव्हीए क्षमतेची १११ वितरण रोहित्रे व १०० केव्हीए क्षमतेची ६१ वितरण रोहित्रे नादुरुस्त झालेली होती. त्यापैकी डिसेंबर, २०१६ अखेर ६३ केव्हीए क्षमतेची ९५ वितरण रोहित्रे व १०० केव्हीए क्षमतेची ५३ वितरण रोहित्रे बदलण्यात आली आहेत. उर्वरित ६३ केव्हीए क्षमतेची कृषीपंपाची १६ वितरण रोहित्रे व १०० केव्हीए क्षमतेची कृषीपंपाची ८ वितरण रोहित्रे, जानेवारी, २०१७ मध्ये बदलण्यात आली असून सद्यस्थितीत सदर ठिकाणी शेतकऱ्यांची कोणतीही तक्रार नाही.

निलंगा विभागांतर्गत समाविष्ट गावे ग्राहकांच्या व प्रशासकीय सोयीसाठी महावितरणच्या लातूर विभागाला जोडण्याबाबत तपासणी केल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयात वांबोरी फाट्यावर व रंधा (ता.अकोले) येथे अवैध मद्य साठा जप्त करण्यात आल्याबाबत

**(१६) * ७७५३३ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात वांबोरी फाट्यावर (नगर-औरंगाबाद रोड) सुमारे ८ लाख २६ हजार रुपये किंमतीचा अवैध मद्य साठा व रंधा (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे एका मोटारीत ३३६ देशी दारुच्या बाटल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील दोषींना पोलीसांनी अटक करून त्यांची चौकशी केली आहे काय, तसेच चौकशीअंती दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.२, श्रीरामपूर यांनी दि.२७/१२/२०१६ रोजी नगर-औरंगाबाद रोड, वांबोरी फाटा, ता.जि. अहमदनगर येथे दमण प्रदेश निर्मित अवैध मद्याची वाहतुक करीत असताना टाटा इंडिगो मांझा वाहनातून रु.८,२६,७५०/- किंमतीचा मद्य साठा जप्त केला आहे. याप्रकरणी गु.र.क्र.५६१/२०१६ नोंदवून एका आरोपीस अटक करण्यात आली.

तसेच दि.२९/१२/२०१६ रोजी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, संगमनेर यांनी भंडारदरा, रंधाशिवार, अकोले, ता.अकोले येथे मारुती ओमनी वाहनातून अवैधरित्या मद्याची वाहतुक होत असताना १८० मि.ली. क्षमतेच्या ३३६ देशी मद्याच्या बाटल्या जप्त केल्या आहेत. सदर गुन्हयात वाहनासह एकूण

रु.१,८९,९४०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. याप्रकरणी गु.र.क्र.२००/२०१६ नोंदवून आरोपीस अटक करण्यात आली. संबंधितांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम ६५ (ई), ८१, ८३, ९० व १०८ प्रमाणे बेकायदेशीरपणे व संगनमताने मद्याची वाहतुक केल्याबाबत गुन्हा दाखल आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे नविन फुल मार्केट बांधण्याबाबत

**(१७) * ७९४२४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे सन १९९३ पासून नेताजी मार्केट, बर्डी परिसरातील फुल मार्केटची जागा असल्याने फुले व्यापाऱ्यांसाठी व ग्राहकांसाठी जागा अपुरी पडत असल्याने उत्पादक ठोक व फुले विक्रेता संघ यांनी नविन फुले मार्केट कृषी उत्पन बाजार समिती गणेशपेठ न्यु कॉटन मार्केट येथील तीन एकर जागेवर स्थलांतरीत करुन देण्यात यावे अशी मागणी लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री यांना केली असल्याचे दिनांक ३१ जानेवारी,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. मुख्यंमत्री महोदयांनी नागपूर शहरामध्ये असलेल्या कृषी उत्पन बाजार समिती गणेशपेठ न्यु कॉटन मार्केट येथील तीन एकर जागेवर फुले मार्केट स्थलांतरीत करुन नविन फुले मार्केट तयार करण्यात येणार आहे,अशी घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या घोषणेनंतरही नविन फुले मार्केट तयार करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर येथे नविन फुले मार्केट सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२), व (३) हे खरे आहे.

(४) नगरविकास विभागाने दिनांक ०७ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयान्वये न्यु कॉटन मार्केट ले-आउट गणेश पेठ येथील कृषी उत्पन्न बाजार समिती करीता आरक्षित असलेली तीन एकर जागा, नागपूर कृषी उत्पन्न बाजार

समितीस थेट वाटप करण्यास मान्यता दिलेली असून नागपूर सुधार प्रन्यासच्या जमिन विनियोग नियमातील तरतूदीनुसार, दर नियंत्रण समितीने केलेल्या शिफारशी नुसार नागपुर सुधार प्रन्यासने जागेचे मुल्यांकन ठरविण्यात यावे असा शासन निर्णय झालेला आहे. त्यानुसार जागा नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ताब्यात आहे.

(५) सदर शासन निर्णयात जमीनीचा मोबदला किती असावा याविषयी उल्लेख नसल्यामुळे व बाजार समितीने या विषयी पुढे काही कार्यवाही न केल्याने जमीनीचा मोबदला अद्याप दिलेला नाही. दरम्यान बाजार समितीने सदर जागेच्या लिजचे नुतनीकरण करून देण्याची मागणी नागपूर सुधार प्रन्यासकडे केलेली आहे.

-----------------

**बावची (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थीनीचा तापाने मृत्यू झाल्याबाबत**

**(१८) * ८२३९० डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावची (ता.रेणापूर जि.लातूर) येथील अनूसुचित जाती मुलींच्या शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थीनी तापाने आजारी असतानाही आश्रमशाळेतील कर्मचारी व अधिक्षकांनी दुर्लक्ष केल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, याबाबत जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर घटनेबाबत संबंधित मुलीच्या पालकांनी सांगितलेले नाही. तथापि सदर घटनेची चौकशी करण्यासाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर यांनी नेमलेल्या समितीला चौकशीदरम्यान आश्रमशाळेतील प्रभारी मुख्याध्यापिका व प्रभारी अधिक्षिकांनी दुर्लक्ष केल्याचे आढळून आलेले आहे.

(३) होय, याबाबत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर यांनी दि.१३/०२/२०१७ च्या आदेशान्वये तीन महिला गृहपालांची समिती स्थापन करून चौकशी केली आहे, तसेच या घटनेस जबाबदार असणा-या प्रभारी मुख्याध्यापिका व प्रभारी अधिक्षिका यांचे विरुद्ध कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पाळा (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथील निवासी आश्रमशाळेमध्ये ५० विद्‌यार्थी बोगस आढळून आल्याबाबत**

**(१९) * ७५७६४ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाळा (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथील निवासी आश्रमशाळेमध्ये विद्‌यार्थीनींवर दिनांक २ नोव्हेंबर, २०१६ रोजी अत्याचार झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर शाळेची मान्यता रद्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आश्रमशाळेमधील ३८८ विद्‌यार्थ्यांचे समायोजनाच्या प्रक्रिये दरम्यान सदर शाळेत ५० विद्‌यार्थी बोगस असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) त्यानुसार सदर बोगस विद्‌यार्थ्यांची नोंदणी केव्हा करण्यात आली आहे व या ५० विद्‌यार्थ्यांकरीता संबंधित शिक्षण संस्थेला आत्तापर्यंत आदिवासी विकास विभागाने विविध योजनांद्‌वारे किती अनुदान दिले आहे व सदर अनुदानाची रक्कम संबंधित संस्थाचालकांकडून वसुल करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, या गैरकारभाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(५) असल्यास, त्यानुसार आश्रमशाळेच्या संचालक, मुख्याध्यापक व दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय. हे खरे आहे.

(२) सदर आश्रमशाळेतील ३९२ विद्यार्थ्यांपैकी ३४६ विद्यार्थ्यांचे ३५ शाळांमध्ये समायोजन करण्यात आले आहे. उर्वरित ४६ विद्यार्थ्यांपैकी २६ विद्यार्थी इतर शाळांमध्ये शिकत असल्याचे आढळून आले व २० विद्यार्थी दिलेल्या पत्त्यावर आढळून आलेले नाहीत.

(३) परिरक्षण अनुदान पटसंख्येनुसार मंजूर करण्यात येत नाही. आश्रमशाळेला वर्षभरात दिलेल्या भेटींपैकी किमान उपस्थिती असलेल्या तीन भेटींच्या सरासरीनुसार परिरक्षण अनुदान मंजूर करण्यात येते. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात ३८१ पटसंख्येपैकी २४४ प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांचे रु.२७,९१,६९२/- परिरक्षण अनुदान अदा करण्यात आले आहे. याप्रमाणे प्रतिवर्षी संस्थेस अनुज्ञेय अनुदान अदा करण्यात आलेले आहे. त्यापैकी वरील ४६ विद्यार्थ्यांकरिता त्यांचे दाखल दिनांकापासून किती अनुदान दिले आहे याबाबत लेखापरीक्षण करण्यात येत आहे. त्यानुसार वसुलीबाबत नियमानुकुल कार्यवाही करण्यात येईल.

(४) व (५) बोगस विद्यार्थी प्रकरणी संस्थेचे अध्यक्ष, प्राथमिक मुख्याध्यापक, माध्यमिक मुख्याध्यापक, लिपिक, ३ प्राथमिक शिक्षक व १ माध्यमिक शिक्षक यांचेविरुध्द दि.३०.११.२०१६ रोजी भां.दं.वि. कलम ४२०, ४९८, ४७१, कलम ३४ अन्वये हिवरखेड पोलीस स्टेशन येथे F.I.R. दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस तपास पूर्ण होऊन प्रकरण खामगाव सत्र न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. सदर प्रकरणी विलंब झालेला नाही.

-----------------

## नागपूर शहरातील मुलींच्या वसतिगृहामध्ये सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(२०) * ७४१६३ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील मुलींच्या ८ वसतीगृहात विद्यार्थीनींना निकृष्ट दर्जाचे भोजन देण्यात येत असून वीज व शुध्द पाणी इ. पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने सदर विद्यार्थीनींनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान आदिवासी आयुक्त कार्यालयात आंदोलन करुन कामकाज बंद पाडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबधित वसतीगृहाच्या प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) नागपूर शहरातील वसतीगृहामधील विद्यार्थ्यांनी नागपूर प्रकल्प कार्यालयासमोर आंदोलन केले होते परंतु कार्यालयीन कामकाज बंद पाडले नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, नागपूर शहरात आदिवासी मुलांसाठी ५ व मुलींसाठी २ अशी एकूण ७ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. त्यापैकी मुलांचे (क्षमता १०००) व मुलींचे (५०० क्षमता) या दोन वसतीगृहात माहे सप्टेंबर, २०१६ पासून ४ महिन्याचा निर्वाह भत्ता न मिळणे तसेच मुलांचे वसतीगृह (१००० क्षमता) मध्ये सुरळीत पाणीपुरवठा न होणे या मुख्य मागण्यांकरीता विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. उपरोक्त समस्यांचे निराकरण करण्यात आलेले आहे.

सदर वसतीगृहातील विद्यार्थ्यांना नियमित आहार देण्यात येत असून आहाराबाबत विद्यार्थ्यांची तक्रार नाही. तसेच विद्युत पुरवठा खंडीत होण्याची समस्या निर्माण झालेली नाही.

(३) याप्रकरणी मुलांच्या वसतीगृह इमारतीमधील नादुरूस्त असलेले मोटरपंप दुरूस्त करण्यात आले असून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे. तसेच निर्वाह भत्ता या बाबीसाठी पुरेसा निधी अर्थसंकल्पीत न झाल्याने सप्टेंबर, २०१६ पासून ४ महिन्यांचा निर्वाह भत्ता प्रलंबित होता, सदर बाबीसाठी जानेवारी, २०१७ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करून देण्यात आलेला असून विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता अदा करण्यात आलेला आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त उद्भवलेल्या अडचणी सोडविण्याकरीता दुर्लक्ष केल्याच्या कारणास्तव संबंधित वसतीगृहांच्या ६ गृहपालांविरूद्ध प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली असून त्यांची एक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे.

-----------------

## बुलढाणा व मोताळा (जि. बुलढाणा) या तालुक्यातील विद्युत उपकेंद्रास ३३ के.व्ही. लाईनचे स्वतंत्र फीडर जोडणेबाबत

**(२१) * ८३११७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा व मोताळा तालुक्यातील ३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्रात सतत बिघाड होऊन नादुरूस्त होत असल्याने शेतक-यांना मुबलक विज पुरवठा होत नसल्याची बाब माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यान्वित असलेल्या उपकेंद्रांना ३३ के.व्ही. लाईनचे स्वतंत्र फिडर व पॉवर ट्रान्सफार्मर नसल्याने सदर उपकेंद्र सतत नादुरूस्त असते हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) बुलढाणा तालुक्यातील ३३ के.व्ही. हतेडी उपकेंद्रामध्ये दि. २६.०१.२०१७ रोजी १९:४५ वाजता अचानक तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याने उपकेंद्रामधील वीज पुरवठा खंडीत झाला होता. त्यामुळे वीज खंडीत झालेल्या ११ के.व्ही. कोलवड व दुधा वाहिनीचा वीज पुरवठा तात्पुरता इतर चालू फिडरवर वळवून त्याच दिवशी २१:३० वाजता या वीज वाहिन्यांचा वीज पुरवठा पुर्ववत सुरु करण्यात आला आहे. तसेच दि. ३०/०१/२०१७ रोजी १६.०० वाजता नादुरुस्त रिले बदलण्यात आले व विद्युत पुरवठा पुर्ववत सुरु करण्यात आला.

(२) हे खरे नाही.

(३) बुलढाणा व मातोळा तालुक्यातील सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांना समक्ष व सुरळीत वीज पुरवठा मिळावा याकरिता महावितरण कंपनीकडून दिन दयाळ ग्राम ज्योती योजना (DDUGJY) अंतर्गत पायाभूत सुविधा उभारणीकरता पुढील प्रमाणे विविध कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

३३/११ के.व्ही. चे एक नविन उपकेंद्र, ३३ के.व्ही. ची ९ कि.मी विद्युत वाहिनी, ११ के.व्ही. ची ६० कि.मी. ची विद्युत वाहिनी, ६३ केव्हिए ची ४ नविन वितरण रोहित्रे, १०० के.व्ही. ची ३० नविन वितरण रोहित्रे, २.९५ कि.मी. ची लघुदाब वाहिनी.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आसेगाव व करजगाव (जि.अमरावती) येथे १३२ के. व्ही. च्या उपकेंद्रांची निर्मिती करण्याबाबत

**(२२) * ८१२५५ डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर):** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील अचलपूर व चांदूरबाजार या विद्युत उपकेंद्राना अमरावती वरून विद्युत पुरवठा होत असल्यामुळे वारंवार वीजपुरवठ्याची समस्या निर्माण होत असल्याने सदर समस्या दूर व्हावी यासाठी अचलपूर व चांदूरबाजार उपकेंद्रांची क्षमता वाढवावी तसेच आसेगाव व करजगाव येथे १३२ के. व्ही. च्या उपकेंद्रांची निर्मिती करावी अशी मागणी येथील लोकप्रतिनिधींनी मा. उर्जामंत्री यांचेकडे दिनांक ५ डिसेंबर २०१६ रोजी वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त निवेदनात अमरावती जिल्ह्यातील (ता. अचलपूर) हरमा मेघनाथपूर व हिरुलपूर्णा येथे इन्फ्रा २ योजने अंतर्गत ३३ केव्हीच्या उपकेंद्रांना शासनाने मंजुरी दिली असूनही सदरहू काम संथगतीने चालू असल्यामुळे हे काम तातडीने होण्याबाबतची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महावितरण कंपनीने अचलपूर विभागाकरीता इन्फ्रा-२ योजनेच्या कामाचे कंत्राट निविदा प्रक्रियेव्दारे मे. कौस्तुभ इंजिनिअर्स, औरंगाबाद यांना दि. १७ जानेवारी, २०१५ मध्ये दिले होते. सदरचे काम जानेवारी, २०१७ पूर्ण करावयाचे होते. परंतु कंत्राटदाराने माईलस्टोन प्रमाणे कामे न केल्यामुळे सदर

कंत्राट दि. ०१.०६.२०१६ रोजी अंशत: रद्द करुन हाती घेतलेली कामे आता मार्च, २०१७ पर्यंत पूर्ण करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच त्यांनी हाती न घेतलेल्या कामाच्या एकूण रु. २६.७८ कोटींच्या ११ निविदा अमरावती परिमंडळाने काढून कामाचे आदेश ऑगस्ट, २०१६ मध्ये देण्यात आले. सदर कामे प्रगतीपथावर आहेत. मे. कौस्तुभ इंजिनिअर्स यांना कामास विलंब झाल्यामुळे कंत्राटाच्या नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कागल (जि. कोल्हापूर) येथील औद्योगिक वसाहतीमधील भूखंडावर उद्योग सुरु करण्यात आले नसल्याबाबत

**(२३) * ८१२०८ श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागल (जि. कोल्हापूर) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये आजी-माजी अधिका-यांसह अनेक भूखंड माफीयांनी बेनामी पध्दतीने भूखंड घेतले असून या जागांवर कोणताही उद्योग सुरू केला नसून अन्य उद्योजकांना त्या जागा भाड्याने दिल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण १२७९ भूखंड आरेखित करण्यात आले असून त्यापैकी ७४१ भूखंड धारकांनी बीसीसी घेतले आहे.उर्वरित ५३८ भूखंडांपैकी उत्पादनातील भूखंड-७८, उत्पादन सुरु करुन बंद पडलेले-८,बांधकाम पूर्ण परंतु उत्पादन सुरु नसलेले-३१,अर्धवट बांधकाम असलेले -७५,विकास कालावधी असलेले -२१७,विकास कालावधी संपुष्टात आलेले व भूखंड विकसित न केलेले -८९उद्योग संजीवनीमध्ये भाग घेतलेले-३२ तर

न्यायप्रविष्ट असलेले-८ भूखंड आहेत.सद्य:स्थितीमध्ये ज्या भूखंडधारकांनी अद्यापी भूखंड विकासाकरिता कोणतीही कार्यवाही केली नाही अशा ७० भूखंडधारकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने निकषांचे पालन न करता ५ कोटी रुपयांचे गृहकर्ज वाटप केल्याबाबत**

**(२४) * ८२०५७ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने गृहकर्जाबाबत सन २०१० मधील परिपत्रकाकडे दुर्लक्ष करुन संचालकांनी निकषांचे पालन न करता सुमारे ५ कोटी रुपयांचे गृहकर्ज वाटप केल्याची बाब माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गृहकर्ज अपहार प्रकरणी संचालकांना जबाबदार धरण्याची शिफारस जिल्हा उपनिबंधकांनी सहकार आयुक्तांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रु. ३६९.७० लाख वाटप केलेल्या गृहकर्ज प्रकरणाचा चौकशी अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी त्यांच्या दि. ७/१०/२०१६ च्या पत्रान्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना सादर केलेला आहे.

(२) नाही.

(३) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशीचे आदेश दि. २३/२/२०१७ रोजी निर्गमित केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धेरंड-शहापूर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील गावसंरक्षण बंधाऱ्याची टाटा पॉवर कंपनीमार्फत दुरुस्ती करण्याबाबत**

**(२५) * ७४५११ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धेरंड-शहापूर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील कोळशावर चालणाऱ्या विद्युत निर्मितीसाठी टाटा पॉवर कंपनीच्या प्रकल्पासाठी एमआयडीसीमार्फत सन २००९ पासून शेतकऱ्यांच्या हजारो एकर जमिनी संपादित करण्यात आल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनी संपादित करण्यात आल्यापासून कंपनीकडून कोणत्याही प्रकारची गावसंरक्षण बंधाऱ्यांची दुरूस्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नादुरूस्तावस्थेत असलेले गाव व शेती संरक्षण बंधारे भरतीच्या वेळी फुटून शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होवून शेती नापीक होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून टाटा पॉवर कंपनीमार्फत संरक्षक बंधारे बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई : (**१) अलिबाग तालुक्यातील मौजे धेरंड व शहापूर येथील ३८७.७५० हे.आर. क्षेत्र म. औ. वि. महामंडळाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये संपादित करुन मे. टाटा पॉवर कंपनीच्या औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी दि.२४/११/२०१४ रोजी क्षेत्राचा ताबा सुपूर्द केलेला आहे.

(२), (३) व (४) टाटा पॉवर कंपनीने धेरंड खारभूमी योजना धाकटा पाडा शहापुर खारभूमी योजना व मोठा पाडा शहापुर (खाजगी खारभूमी )योजनांचे क्षेत्र संपादन केलेले आहे. धेरंड व धाकटा पाडा शहापुर या सरकारी खारभूमी योजना असल्याने सदर योजनांची देखभाल दुरुस्ती खारभूमी विकास उपविभाग, अलिबाग यांच्यामार्फत करण्यात येत आहे. जमिनी संपादित केल्यापासून टाटा पॉवर

कंपनीकडून रक्कम रु.२२.३६ लक्ष कार्यकारी अभियंता खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग पेण यांचेकडे जमा करण्यात आली आहे. त्यानुसार संरक्षण बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच मोठा पाडा शहापुर ही खाजगी खारभूमी असल्याने त्या बांधांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी टाटा पॉवर कंपनीची आहे. या योजनेच्या दुरुस्तीबाबत रक्कम रु.९,९१,५१०/- इतके अंदाजपत्रक तयार करुन टाटा पॉवर कंपनीस कार्यकारी अभियंता खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग पेण यांनी सादर केले असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खापरखेडा (जि.नागपूर) औष्णिक विद्युत केंद्रातील अधिक्षक अभियंत्यास लाच घेताना झालेली अटक

**(२६) * ८१०९९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानिर्मितीच्या खापरखेडा (जि.नागपूर) येथील वीज प्रकल्पात वाहन पुरविण्याचे कंत्राट मिळवून देण्यात मदत केल्याबाबत तसेच थकीत बिलांची रक्कम मिळवून देण्यासाठी कंत्राटाच्या एकूण रक्कमेच्या तीन टक्के अर्थात ३ लाख ७५ हजार रूपयांची लाच अधिक्षक अभियंत्यांनी मागितली असता त्यातील पहिल्या टप्प्यातील ५० हजारांची लाच स्वीकारतांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अधिक्षक अभियंता यांना पकडून अटक केली असल्याची माहिती दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) संबंधित अधिक्षक अभियंता यांच्याविरुध्द गुन्हा दाखल होऊन अटक झाल्यामुळे, महानिर्मिती कंपनीने दि. ४ फेब्रुवारी, २०१७ पासून त्यांना सेवेतून निलंबित केले आहे. पुढील चौकशी पोलीसांमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिंचपूर (जि.अमरावती) या पूनर्वसीत गावातील विद्युत पूरवठ्याकरिता स्वतंत्र एक्सप्रेस फिडर कनेक्शन देणेबाबत

**(२७) * ८१७०२ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील लोअर वर्धा प्रकल्पांतर्गत चिंचपूर या पुनर्वसित गावातील नविन गावठानाला सार्वजनिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होण्यासाठी नियमित विद्युत पुरवठ्याकरिता स्वतंत्र एक्सप्रेस फिडर कनेक्शनचे अंदाजपत्रक देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी कार्यकारी अभियंता (ग्रा.) म.रा.वि.वि.क.मर्या. अमरावती यांना दि. ७ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे कळविले आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कनेक्शन करीता आवश्यक निधी लोअर वर्धा प्रकल्प विभाग उपलब्ध करुन देणार असल्याचेही प्रकल्प विभागाने विद्युत कंपनीस दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ चे पत्रान्वये लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निधीतून महावितरणामार्फत उक्त पाणीपुरवठा योजनेस तात्काळ विद्युत पुरवठा होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) धामनगाव रेल्वे नगर परिषद पाणीपुरवठा एक्सप्रेस फिडरवरुन वीजपुरवठा करण्यासाठी निम्न वर्धा प्रकल्प विभागाने महावितरण कंपनीस दि. ११/८/२०१६ रोजी पत्र दिले होते. परंतु याबाबत

धामनगाव रेल्वे नगरपरिषदेकडून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही. त्यामुळे दुसरा पर्याय म्हणून ३३ के व्ही अंजनसिगी उपकेंद्र मधून नवीन एक्सप्रेस फिडरव्दारे वीज पुरवठा करण्यासाठी पैसे भरण्याबाबतचे संमती पत्र कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प वर्धा, यांच्याकडून मागणी करण्यात आली असून ते अद्याप त्यांच्याकडून महावितरण कंपनीस प्राप्त झाले नाही.

(३) निधी देण्यास संमती पत्र प्राप्त होताच पुढील कार्यवाही महावितरणकडून करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोळेवाडी (ता. राहूरी, जि. अहमदनगर) येथील शासकीय आश्रमशाळेतील गैरसोयींबाबत**

**(२८) * ७६९९३ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील राजूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या ५ वसतिगृहांना स्वत:ची इमारत नसून अशुध्द पाणी, सभोवताली अस्वच्छता व निकृष्ट भोजन व्यवस्था या गैरसोयींमुळे विद्रोही विद्यार्थी संघटनेच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी राजूर येथील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयावर मोर्चा काढून अधिकारी व ठेकेदारांना निलंबित करावे अशी मागणी केल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोळेवाडी (ता.राहूरी, जि. अहमदनगर) येथील शासकीय आश्रमशाळेत देखील पिण्याच्या पाण्याची टाकी अस्वच्छ व अनाच्छादित असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष व अधिक्षकांचा गैरकारभार याबाबत राज्य उपाध्यक्ष, मानव अधिकारी परिषद यांनी मा. मुख्यमंत्री व मा. आदिवासी विकास मंत्री यांचेकडे दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने उक्त सोयीसुविधा पुरविण्यास अपयशी ठरलेल्या आश्रमशाळेच्या प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न भाग (१) विद्रोही विद्यार्थी संघटनेने दि. १९.१२.२०१६ रोजी सादर केलेले निवेदनातील प्रकल्प अधिकारी, राजूर अंतर्गत प्रलंबित शिष्यवृत्ती अदा करणे, शासकिय वसतीगृहांतील पाणी पुरवठ्याची व्यवस्था या मागण्यांबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. तर शासकिय वसतीगृह श्रीरामपूर येथील गृहपालाबाबतच्या तक्रारित तथ्य आढळून आले नाही.

प्रश्न भाग (२) कोळेवाडी शासकीय आश्रमशाळेबाबत शासनाने या पुर्वी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शासन पत्र दि.२१.१०.२०१६ अन्वये आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांना शाळेस भेट देउन चौकशी करण्याबाबत कळविले होते. त्याअनुषंगाने सहायक आयुक्त दर्जाच्या आधिका-याने शाळेस भेट देऊन चौकशी केली आहे. सदर तक्रारीची चौकशी केली असता सदर तक्रार ही वैयक्तीक स्वार्थापोटी व आर्थिक लाभापोटी केली असल्याचे निदर्शनास आले आहे.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सकस व पौष्टीक आहार देण्यात येत आहे. तसेच आश्रमशाळेतील पाण्याची टाकी ही पुर्णपणे झाकलेली असुन वेळोवेळी टाकीची स्वच्छता केली जाते. तसेच आश्रमशाळेचा परीसर स्वच्छ ठेवण्यात येत असुन विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे लक्ष देण्यात येत आहे. परंतु चौकशी दरम्यान शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी शाळेत मुक्कामी थांबत नसणे,शाळेचे डे-बुक(दैंनिक पट) भरलेला नसणे,शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम न घेणे,वर्ग ४ चे कर्मचा-यांनी काम व्यवस्थित न करणे, मुख्याध्यापक व अधिक्षक यांचे शालेय प्रशासनाकडे दुर्लक्ष असणे ई.प्रशासकीय त्रुट्या आढळुन आल्याने त्याबाबत कारवाई करुन मुख्याध्यापक व अधिक्षक यांची अन्यत्र बदली करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यावरील अत्याचाराच्या घटना निदर्शनास आलेल्या आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्याबाबत

**(२९) * ८१५९६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विद्यार्थीनींवर होणाऱ्या अत्याचाराच्या व गैरसोयीच्या घटना निदर्शनास आलेल्या सर्व आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्यात यावी अशी मागणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा यांनी केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गेल्या वर्षभरात मानखुर्द(चेंबूर), पनवेल(रायगड), चांदूर बाजार(अमरावती), खामगाव (बुलढाणा), सिंदफणा(बीड) आणि उंब्रज(सातारा) येथील आश्रमशाळेतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांकडून मुलींच्या लैगिक शोषणाच्या एकूण सहा घटना निदर्शनास आल्याने आश्रमशाळेत शिकणाऱ्या मुलींच्या सुरक्षिततेबाबतचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील आश्रम शाळेतील आदिवासी विद्यार्थीनीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या माहे नोव्हेबर २०१६ मध्ये निदर्शनास आलेल्या घटनेनंतर मा. मुख्यमंत्री यांनी राज्यातील सर्व आश्रमशाळांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे निर्देश संबंधित विभागास दिले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने राज्यातील आश्रमशाळांची चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्याबाबत व उक्त आश्रमशाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनींचे अन्य आश्रमशाळामध्ये समायोजन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांची अशा प्रकारची मागणी या विभागाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) या विभागांतर्गत अशा प्रकारच्या घटना निदर्शनास आलेल्या पाळा (ता.खामगांव, जि. बुलढाणा) व मकरधोकडा (ता.देवरी, जि. गोंदिया) येथील आश्रमशाळांची मान्यता विभागाने रद्द केलेली आहे. तसेच सामाजिक न्याय विभागाच्या उंब्रज व सिंदफणा या शाळांची मान्यता रद्द केलेली आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) शासन परिपत्रक दि. ५.११.२०१६ अन्वये जिल्हाधिकारी यांनी गठीत केलेल्या जिल्ह्यातील महिला अधिका-यांच्या समितीने आदिवासी विकास विभागातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची तपासणी पूर्ण केली आहे. सर्व जिल्ह्यांतील आश्रमशाळांचे तपासणी अहवाल सादर केलेला आहे.

लैंगिक अत्याचाराच्या निदर्शनास आलेल्या घटना लक्षात घेवून आदिवासी विकास विभागाच्या पाळा, (ता.खामगांव जि. बुलढाणा), मकरधोकडा (ता.देवरी जि. गोंदिया), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या उंब्रज (ता.कराड, जि.सातारा) व सिंदफणा (ता.शिरुर(का.), जि.बीड) या आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्यात आली आहे.

मान्यता रद्द करण्यात आलेल्या आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे शासकीय आश्रमशाळा, नामांकित शाळा व जिल्हा परिषद शाळांमध्ये समायोजन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील टेक्सटाईल पार्क उभारण्याबाबत

**(३०) * ८१५८८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव येथे शासनाने टेक्सटाईल पार्क मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या टेक्सटाईल पार्कसाठी भूसंपादान करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, टेक्सटाईल पार्कचे स्वरूप व रूपरेषा काय असणार आहे,

(४) तसेच टेक्सटाईल पार्क उभारणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) ते (५) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, मुंबई यांनी खामगाव, जि.बुलढाणा येथे प्रस्तावित टेक्सटाईल पार्क हे महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळामार्फत स्थापित करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. सदर प्रस्तावास मा.मुख्यमंत्री महोदयांनी सहमती दिली आहे. त्यानुषंगाने टेक्सटाईल पार्कसाठी आवश्यक शासकीय जमिन उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत, जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे विचारणा करण्यात आली होती. जिल्हाधिकारी यांनी टेक्सटाईल पार्कसाठी ४० हेक्टर शासकीय जमिन उपलब्ध असल्याचे कळविले आहे. सदर जमिन महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याबाबत महसूल विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावावर महसूल विभागात कार्यवाही सुरु आहे. जमिन हस्तांतरणाची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.